# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 18 August 2024

Time: 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १८ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

मुंबईत २००८ साली झालेल्या २६/११च्या दहशतवादी हल्ल्याचा आरोपी तहव्वूर हुसैन राणाला भारताच्या ताब्यात देण्याचा निर्णय अमेरिकेच्या अपील न्यायालयानं दिला आहे. भारत-अमेरिका उभय देशातल्या हस्तांतरण करारानुसार सध्या लॉस एंजलिसच्या तुरूंगातील राणाचं हस्तांतरण होऊ शकतं. राणा हल्ल्याचा मुख्य सूत्रधार असलेल्या डेविड हेडलीशी संबंधित असून, त्याचा पाकिस्तानी गुप्तहेर संघटना आयएसआयशी संबंध असल्याचाही आरोप आहे.

****

नागरिकत्व सुधारणा अधिनियम अर्थात सीएए अंतर्गत विस्थापीत १८८ हिंदूंना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज अहमदाबाद इंथ एका कार्यक्रमात भारताचं नागरिकता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. गुजरातच्या दौऱ्यावर असलेल्या गृहमंत्री शाह यांनी अहमदाबाद महापालिकेच्या अनेक विकास कामांचं उद्घाटन आज सकाळी केलं.

****

मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी आज विजा आणि जोराच्या वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, येत्या दोन-तीन दिवसांत पश्चिम बंगालसह हिमालयाशी जोडलेला भाग ईशान्येकडील राज्ये तसंच केरळ,तमिलनाडु आणि लक्षद्वीपमध्येही तीव्र स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****

काँग्रेस पक्षातर्फे परवा मंगळवारी वीस ऑगस्टला माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीदिनी मुंबई इथं कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यात पक्ष राष्ट्रीय अध्यक्ष-राज्यसभा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री-शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांसह काँग्रेसचे वरीष्ठ नेते उपस्थित असणार आहेत.

****

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन तब्बल पावणे पाच कोटी रुपये किंमतीचं अंमली पदार्थ कोकेन जप्त करत आरोपीला ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे. इथिओपिया एयरलाईन्स विमानातून प्रवास करणाऱ्या केनियन इसममाची तपासणी केली असता अंमली पदार्थाच्या गोळ्या शरीतून लपवून आणल्याचा प्रकार उघडकीस आला होता.

****

छत्रपती संभाजीनगर इंथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठानं ६६ व्या वर्धापनदिनी देण्यात येणारा जीवनसाधना पुरस्कार ज्येष्ठ लोककलावंत पांडुरंग घोटकर यांना जाहीर केला आहे. हा पुरस्कार वर्धापनदिनी २३ ऑगस्ट रोजी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते प्रदान केला जाणार असल्याचं विद्यापीठ प्रशासनानं कळवलं आहे.

****

महाराष्ट्रासाठी केंद्र सरकारनं सढळ हस्ते मदत केल्यानं गेल्या चार महिन्यात एक लाख कोटींची  गुंतवणूक राज्यात झाली. राज्यात मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी १५ हजार कोटींचा निधी मंजूर झाल्यानं राज्यात जगातील सर्वात मोठं मेट्रोचं जाळं पुण्यासह मुंबई परिक्षेत्रात विणलं जात असल्याचं शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी म्हटलं आहे. बाळासाहेब भवन इथं आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. केंद्र सरकारने राज्याला काय दिलं असे विचारणाऱ्या विरोधकांवर खासदार देवरा यांनी

या माहितीद्वारे उत्तर दिलं. वाढवण बंदरासाठीच्या निधीचाही यात समावेश असल्याचं देवरा म्हणाले.

****

भारतानं आर्थिक राष्ट्रवाद स्वीकारुन उद्योग, व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राने टाळता येण्यासारखी आयात टाळत स्थानिक उत्पादनास प्राधान्य देण्याचं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. ते काल व्यंकटचलमच्या स्वर्ण भारत ट्रस्ट इथं आयोजित कार्यक्रमात बोलत होते. देशाचं चलन भांडार रितं होण्यासह भारतीय कामगारांच्या रोजगाराच्या संधी कमी होणं आणि उद्योजकतेच्या विकासामध्ये होणारा अडथळा यामुळे आयातीचा अर्थव्यवस्थेवर होणारा नकारात्मक परिणाम याद्वारे उपराष्ट्रपतींनी अधोरेखित केला. एक देश म्हणून, आपल्याला दीर्घकालीन राष्ट्रीय हितांऐवजी सहज-झटपट आर्थिक लाभाला प्राधान्य देणं परवडणारं नाही असही ते म्हणाले.

****

चीनमध्ये चेंगडू इथं परवा मंळवारी वीस तारखेपासून सुरू होणाऱ्या १५ आणि १७ वर्षांखालील कनिष्ठ गट आशियाई अजिंक्य पद बडमिंटन स्पर्धेसाठी भारताचा ३९ खेळाडूंचा संघ रवाना झाला आहे.मागिल  वर्षी या स्पर्धेत भारतानं एका सुवर्णासह तीन पदकं पटकावली होती.दरम्यान, पुढील वर्षी कनिष्ठ गटाच्या जागतिक अजिंक्य पद स्पर्धेचं यजमानपद भारतानं स्वीकारलं आहे

****